● गुरुवार, दि. ५ डिसेंबर २०२४ ● जालना ● वर्ष ६ वे ● अंक १२७ वा ● किमंत २ रुपये ● पाने ४
8390098886 yuva.aadarsh@gmail.com 8390048886

जवेरूहुता हॉस्पिटल
टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
मोरया मेडीकल अँण्ड जनरल स्टोअर्स
MEDICAL टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
एक वेळ अवश्य भेट द्या
डॉ. आनंद भाले Mob. 8208427524
प्रो.प्रा. विशाल देशमुख Mob. 7770084597

https://yuvaadarsh.com

# युवा आदर्श

संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके

https://facebbook.com/yuva.aadarsh/ https://youtube.com/@Yuva_Aadarsh/ https://twitter.com/Yuva_aadarshjln/ RNI: MAHMAR/2019/78282

## मराठ्यांशी बेईमानी करायची नाही, आरक्षण द्यावे लागणार - मनोज जरांगे

**जालना । प्रतिनिधी -** मराठ्यांशी बेईमानी करायची नाही, तुम्हाला आरक्षण द्यावं लागणार आहे हे लक्षात ठेवा असा इशारा मनोज जरांगेंनी दिला आहे. मराठ्यांच्या मतांशिवाय कुणी सत्तेत येऊ शकत नाही हे विसरु नका असंही मनोज जरांगे म्हणाले. तसेच शपथविधी झाला की शुभेच्छा देऊ नाहीतर त्यांचे पुन्हा काहीतरी लांबले तर आपल्या शुभेच्छा वाया जायच्या असाही टोला जरांगेंनी लगावला.

मराठ्यांना आरक्षण द्यावेच लागेल, सत्ता आली, भरपूर बहुमत मिळाले म्हणून मराठ्यांशी बेईमानी करायची नाही. पहिल्यासारखं लफड्यात पडायचे नाही. यॉंव करेन आणि त्यॉंव करेन असे चालणार नाही. मराठे कुणाच्या बापाला भीत नसतात. मराठा रस्त्यावर उतरला की तुमचं काही खरं नाही. गॅझेट लागू करायचे, मराठा आणि कुणबी एकच आहे. उगाच सत्ता आली म्हणून मस्ती येऊ द्यायची नाही. मराठे कुणाचीही मस्ती टिकू देत नाही तशीच मी पण टिकू देणार नाही. असं मनोज जरांगे यांनी म्हटलं आहे.

लाडकी बहीण योजनेसाठी पैसे आणले कुठून? आम्ही फक्त इतके हजार कोटी आणले हेच ऐकतोय. आता अटी घातल्या आहेत असे कळते म्हणजे योजना बंद करायची आहे का? हे आमचेच पैसे आम्हाला घेऊन दिले आहेत. अटी कशा आहेत ते काय माहीत नाही. शेतमालाला भाव देणार नाहीत, शेतकऱ्यांना मदत करत नाहीत उलट फक्त रस्ते तयार करत आहेत. असेही मनोज जरांगे म्हणाले. तसेच समृद्धीला तर नुसती चित्रेच आहेत. कांद्याला भाव हवा, कापसाला हवा, महागाई वाढली त्यावर काय करायचे? आपण मैदानात असतो तर सूपडा साफ केला असता. मात्र आरक्षण घेणार म्हणजे घेणारच. रक्तपात करेन, हल्ले करेन हे स्वप्न सरकारने सोडून द्यावे असेही मनोज जरांगेंनी म्हटले आहे.

आरक्षणाचा मुद्दा ज्वलंत आहे. माध्यमांनी हा मुद्दा उचलून धरला होता आणि धरला आहे. उपोषणाची तारीख आम्ही जाहीर करणार नाही. त्यांचे सरकार स्थापन होऊदे त्यानंतर आम्ही तारीख जाहीर करु. सगळ्या पक्षांमध्ये आमचा मराठा समाज आहे. सगळे मिळून आरक्षणाची लढाई लढणार आहोत. सगळ्या आमदारांना मराठे बोलायला लावणारे आहेत. जर नाही बोलले तर मतदान करणारेच त्या आमदाराला जाब विचारतील. सरकार



स्थापन होऊ द्या मग उपोषण आंदोलनाची तारीख जाहीर करणार असं मनोज जरांगे यांनी म्हटलं आहे.

## देवेंद्र फडणवीस राज्याचे नवे मुख्यमंत्री

### ‘एक है तो सेफ है’; ‘मोदी है तो मुमकीन है’ - फडणवीस

**मुंबई -** विधानसभेच्या निवडणुकीत महायुतीला बहुमत मिळाल्यानंतर गेल्या जवळपास आठ दिवसांपासून सरकार स्थापनेच्या हालचाली सुरु आहेत. महाराष्ट्राचा मुख्यमंत्री कोण होणार? याकडे अनेकांच्या नजरा लागल्या होत्या. मात्र, मुख्यमंत्री कोण होणार? हे स्पष्ट होत नव्हतं. मात्र, अखेर आज महाराष्ट्राचा मुख्यमंत्री कोण होणार? हे स्पष्ट झालं आहे. आज भारतीय जनता पक्षाच्या आमदारांची गटनेता निवडीची बैठक पार पडली. या बैठकीत गटनेतेपदी देवेंद्र फडणवीस यांची सर्व आमदारांनी एकमताने निवड केली. त्यामुळे आता देवेंद्र फडणवीस हे महाराष्ट्राचे नवे मुख्यमंत्री असणार आहेत.

देवेंद्र फडणवीस यांच्या मुख्यमंत्री पदाचा शपथविधी सोहळा ५ डिसेंबर रोजी मुंबईत पार पडणार आहे. या शपथविधी सोहळ्याला पंतप्रधान नरेंद्र मोदी, अमित शाह यांच्यासह काही राज्याचे मुख्यमंत्री आणि दिग्गज नेते उपस्थित राहणार आहेत. दरम्यान, आज देवेंद्र फडणवीस यांची गटनेतेपदी निवड झाल्यानंतर त्यांनी सर्व आमदारांचे आणि जनतेचे आभार मानले. तसेच आमदारांना संबोधित करत असताना एक है तो सेफ है असा नारा देवेंद्र फडणवीस यांनी दिला. सर्वप्रथम मी सर्व आमदारांचे आभार मानतो. सर्व आमदारांनी एकमताने माझी गटनेतेपदी निवड केली. खरं म्हणजे आपल्या सर्वांना कल्पना आहे की या वेळची निवडणूक ही ऐतिहासिक राहिली. या निवडणुकीने आपल्या समोर एक गोष्ट ठेवली. ती म्हणजे एक है तो सेफ है आणि मोदी है तो मुमकिन है. पंतप्रधान मोदींच्या नेतृत्वात विजयाची मालिका ही लोकसभेनंतर पुन्हा एकदा हरियाणापासून सुरु झाली. महाराष्ट्राने जे बहुमत आपल्याला दिलं. त्याबद्दल मी महाराष्ट्राच्या जनतेला साष्टांग दंडवत घालतो. खरं म्हणजे आपल्याबरोबर एकनाथ शिंदे आणि अजित पवार आहेत, त्यांचेही मी आभार मानतो, असं देवेंद्र फडणवीस यांनी म्हटलं.

एका कार्यकर्त्याला सर्वोच्च पदावर तीन वेळा पंतप्रधान मोदींनी बसवलं. अर्थात एकदा ७२ तासांसाठीच होतो. पण तरीही तांत्रिकदृष्ट्या मुख्यमंत्री होतो. त्यामुळे तीन वेळा मला महाराष्ट्राच्या मुख्यमंत्रिपदावर बसण्याचा मान दिला. हा पक्ष त्यांच्या नेतृत्वात मोठा झाला. त्यातूनच सामान्य कार्यकर्त्याला वेगवेगळी पदं मिळाली, काम करण्याची संधी मिळाली. त्यामुळे मी मोदींचे आभार मानतो. पक्षाचे अध्यक्ष जे.पी. नड्डा यांचेही आभार मानतो, असंही देवेंद्र फडणवीस म्हणाले.

महायुती सरकारचा शपथविधी ५ डिसेंबर रोजी मुंबईतील आझाद मैदानावर होणार आहे. या सोहळ्यासाठी जय्यत तयारी सुरु करण्यात आलेली आहे. या सोहळ्यासाठी पंतप्रधान मोदी यांच्यासह केंद्रातील मंत्री आणि दिग्गज नेते तसेच विविध राज्यातील मुख्यमंत्री देखील उपस्थित असणार आहेत.



### युवा आदर्श

**फोन पे ... (शपथ विधी)**

दिल्लीतून फोन आला
कळले कसे लोकांला
बोलावे शपथविधीला
कसे असे या लेकाला
सर्वत्र हो हल्लागुल्ला
करतात मंत्री कुणाला
विरोधकी जळफळाट
वाव नाही हो गुणाला
घेऊन चला दिल्लीला
बायको आली लाडाला
भाव आला कसा भला
हरबऱ्यांच्या झाडाला
गर्दी केवढी भेटायला
जत्रेचे स्वरूप गल्लीला
आहे मी प्रसिद्ध किती
जरा सांगावे दिल्लीला
जेसिबी भरभरून फुले
आणे कुणी सांडायला
आधी भेट आम्ही घेतो
लोक लागले भांडायला
जोर केवढा मिडीयाला
ब्रेकिंग बातम्या द्यायला
हमरी तुमरी कशी केली
मुलाखत मज घ्यायला
मिठाई सगळी सपाचट
रे लागले पेढे पाडायला
नाटकी काही कलाकार
लागले हमसून रडायला
आला होता फोन मला
फिरकू नका दिल्लीला
अप समज करून घेता
खरे सांगू कसे गल्लीला

**हेमंत मुसरीफ पुणे**
9730306996.

## आ. लोणीकर यांना मंत्रिपद द्यावे

### फडणवीस यांना नरेश कांबळेंचे रक्ताने पत्र

**परतूर । प्रतिनिधी -** परतुर विधानसभा मतदारसंघासह जालना जिल्ह्यातील कष्टकरी, शेतकरी, शेतमजूर, वंचित, विस्थापित व सर्व जातीधर्माला सोबत घेऊन समाजकार्य करणारे परतूर विधानसभा मतदारसंघाचे विद्यमान आमदार बबनराव लोणीकर यांना मंत्रिपद देण्यात यावे अशी मागणी देवेंद्र फडणवीस यांना नरेश कांबळे यांनी स्वतःच्या रक्ताने पत्र लिहित मागणी केली आहे.



पत्रात म्हटले आहे की, लोणीकर हे सर्व जातीधर्माला सोबत घेऊन चालणारे नेते आहेत, कष्टकरी, शेतकरी, शेतमजुर, वंचितांना न्याय देत समाजकार्य ते करताहेत. त्यांनी आयुष्यभर अविरत संघर्ष केला असल्यामुळे त्यांना राज्याच्या राजकारणातील सत्तेत सहभागी करून कॅबिनेट मंत्री करावे अशी मागणी परतूर विधानसभा मतदारसंघातील परतूर येथील भाजपा दलित मोर्चाचे परतुर शहर अध्यक्ष नरेश कांबळे यांनी भाजपा नेते देवेंद्र फडणवीस यांना स्वहस्ताक्षरात स्वतच्या रक्ताने लिहिलेल्या पत्रात म्हटले आहे.

मराठवाड्यातील सर्वात ज्येष्ठ व विजयाची हॅट्रिक करणारे आमदार बबनराव लोणीकर यांना कॅबिनेट मंत्रीपद द्यावे. यासाठी स्वतःच्या शरीरातील रक्त काढून स्वतःच्या हस्ताक्षरात लिहिलेल्या पत्रात नरेश कांबळे यांनी आपल्या भावना व्यक्त केल्या आहेत.

## मागासवर्गीय युवकांनी उद्योग विश्व साकारावे - घनश्यामदास गोयल

### एमएसएमई भीम उद्योग अभियानातर्फे कार्यशाळा

**जालना । प्रतिनिधी -** मागासवर्गीय युवकांना उद्योगाच्या प्रवाहात आणण्यासाठी केंद्र आणि राज्य शासनाच्या अनेक कल्याणकारी योजना असून युवकांनी या योजनांचा लाभ घेऊन स्वतःचे उद्योग विश्व साकारावे असे आवाहन कालिका स्टील चे संचालक उद्योजक घनश्यामदास गोयल यांनी केले.

एम. एस. एम. ई.भीम उद्योग अभियाना तर्फे बुधवारी ( ता.0४) हॉटेल सागर ईन मध्ये उद्योजगता जागरूकता कार्यशाळेच्या उद्घाटन प्रसंगी घनश्यामदास गोयल बोलत होते. अध्यक्षस्थानी एम एस एम इ छत्रपती संभाजी नगरचे संयुक्त संचालक नरेंद्र इस्टोलकर हे होते. यावेळी उद्योजक सुनील भाई रायठ्ठठा, सहाय्यक संचालक राहुल मिश्रा ,एन.एस आय. सी. चे व्यवस्थापक बी. एन.बरनवाल, जिल्हा उद्योग केंद्राचे जगदीश जगताप,

महाबँक आरसेटी चे संचालक मंगेश डामरे ,भीम उद्योग अभियानाचे संस्थापक संजय भालेराव, महासचिव राजेश राऊत, सिनेअभिनेत्री वैशाली दाभाडे, यांची प्रमुख उपस्थिती होती.

घनश्यामदास गोयल म्हणाले, नोकरी मागण्यापेक्षा नोकरी देणारे व्हा घेतलेल्या कर्जाची उद्योगातून परतफेड करून आंतरराष्ट्रीय पातळीवर आपल्या उद्यमशीलतेचा ठसा उमटवा असा सल्ला गोयल यांनी

अध्यक्षीय समारोपात नरेंद्र इस्टोलकर यांनी प्रधानमंत्री विश्वकर्मा योजना क्लस्टर डेव्हलपमेंट याविषयी माहिती देऊन उद्योगात चिकाटी, सातत्य ,कठोर परिश्रमाची तयारी ठेवा असे सांगितले.

राहुल मिश्रा यांनी सूक्ष्म लघु आणि मध्यम उद्योगांचे स्तर उत्पादन सेवा क्षेत्र, मोठ्या उद्योगांना लागणारा कच्चामाल, सौंदर्यप्रसाधने, उत्पादनांची पॅकेजिंग , ब्रॅण्डिंग , ई- मार्केट, शासकीय खरेदी -विक्री ,स्टॅन्ड अप आणि स्टार्टअप याविषयी माहिती दिली.



बी. एन. बरनवाल यांनी अनुसूचित जच्यानव उद्योजकांना कर्ज सुविधा, राष्ट्रीय, अंतरराष्ट्रीय प्रदर्शनांसाठी सबसिडी, सुविधांबद्दल सखोल माहिती दिली. जगदीश जगताप, मंगेश डामरे, अभिनेत्री वैशाली दाभाडे यांनी मार्गदर्शन केले.

संजय भालेराव यांनी भिम उद्योग अभियानाचे ध्येय, युवकांना उद्योगाविषयी प्रेरणा मिळावी, उद्योजक घडावेत अशी भूमिका विषद केली. श्रावण गायकवाड यांनी आभार मानले. भीम उद्योग अभियानाचे प्रदेश महासचिव राजेश राऊत, कार्याध्यक्ष सचिन बावस्कर ,उपाध्यक्ष डॉ. सुरेंद्र खाडे ,जिल्हा समन्वयक मनोज वाकडे यांना नियुक्तीपत्रे देऊन सत्कार करण्यात आला. कार्यशाळेत सुरेश खंडाळे , डॉ. शिवाजी लहाने,यशवंत राऊत, अनिकेत भालेराव, प्रदीप गौतीस, संगीता राऊत, शितल भारती, संतोषी गिरी, प्रियंका मगरे, सत्यशीला राऊत ,कविता गिरी ,कपिल मगरे यांच्यासह ७५ युवक-युवतींनी सहभाग नोंदवला.

**ग्राहकांचे समाधान उद्योगाचा आत्मा - रायठठ्ठा**

मध्ययुगीन कालखंडाच्या अगोदर भारत संपूर्ण जगाच्या तुलनेत २५% निर्यात करणारा देश होता. मध्यंतरी २.५% ते 0३.% प्रमाण आले. केवळ स्वतःचा नफा, मला किती उत्पन्न होईल याचा विचार न करता ग्राहकांची आवड -निवड, त्याची कुवत, खरेदी क्षमता लक्षात घेऊन उद्योग उभारणी करा असा मौलिक सल्ला उद्योजक सुनील भाई रायठठ्ठा

यांनी याप्रसंगी दिला. उत्पादन आणि पैशाला जात नसते ग्राहक हात सोडतो तेव्हा कोणीच वाचवू शकत नाही. असे सांगून ग्राहकांचे समाधान हाच उद्योगाचा आत्मा असल्याने त्यावर लक्ष केंद्रित करा असे रायठठ्ठा यांनी सांगितले.

**गोयल, रायठठ्ठा यांना प्रतिनिधीव द्यावे - राऊत**

नवउद्योजकांच्या अडी- अडचणी, समस्या शासन दरबारी मांडण्यासाठी उद्योजक घनश्यामदास गोयल यांना राज्यसभेवर तर सुनील भाई रायठठ्ठा यांना विधान परिषदेवर प्रतिनिधीत्व द्यावे. अशी मागणी भीम उद्योग अभियानाचे प्रदेश महासचिव राजेश राऊत यांनी प्रास्ताविकात केली. सध्या औद्योगिक क्रांतीचे युग असून नोकरीच्या संधी कमी होत असतांना मागासवर्गीय युवकांनी भटकंती थांबविण्यासाठी आत्मविश्वासाने प्रक्रिया, सेवा उद्योगाची कास धरावी यासाठी भिम उद्योग अभियान प्रयत्नशील असल्याची भूमिका राजेश राऊत यांनी स्पष्ट केली.

संपादकीय पान

## फास्टफुड आरोग्यास घातक

आहारातील घटकांवर आरोग्य अवलंबून असते. रोजचा आहार चौरस असावा म्हणजे त्यात शरीराला आवश्यक असणाऱ्या सर्व पदार्थांचा समावेश असावा असे आहार शास्त्र सांगते. पण धावपळीच्या सध्याच्या काळात लोकांना स्वयंपाकासाठी आणि जेवणासाठी वेळ नाही मग आधार घेतला जातो तो फास्टफुडचा. अगदी लहानांपासून मोठ्यांपर्यंत सर्वच जण फास्टफुड आवडीने खातात. विशेतः शाळकरी मुलांना तर फस्टफुड म्हणजे पर्वणीच वाटते. घरी तयार केलेली भाजी पोळी खाताना किरकिर करणारे मुले फास्टफुड मात्र मिटक्या मारत खातात त्यामुळेच  झटपट तयार होणारे आणि जिभेला हवेहवेसे वाटणारे हे पदार्थ सध्या भरपूर खपतात. जिभेला हवेहवेसे वाटणारे हे पदार्थ प्रकृतीला मात्र चांगले नसतात. झटपट तयार होणाऱ्या या फास्टफुडमध्ये साखर आणि मीठ यांचे प्रमाण  खूप असते शिवाय  ते भरपूर तळलेले देखील असतात. अतीप्रक्रिया केलेल्या या पदार्थात कोणतेही पौष्टिक घटक नसतात त्यामुळे या पदार्थांपासून दूर राहावे असा सल्ला डॉक्टर आणि आहार तज्ज्ञ देत असतात तरी लोक त्यांचे ऐकत नाही. दोन वर्षांपूर्वी एका फास्टफुड बनवणाऱ्या जगप्रसिद्ध  कंपनीने हे मान्य केले होते की ही कंपनी तयार करीत असलेल्या साठ टक्के पदार्थात आणि शितपेयांमध्ये शरीराला पौष्टिक असे काही नाही. या कंपनीचे नुडल्स आणि कॉफी हे दोन पदार्थ जगप्रसिद्ध आहेत. शिवाय चॉकलेट, केक, पास्ता, केचप, वेफर्स,  कुरकुरे यासारखे विविध पदार्थ ही कंपनी बनवते. विशेष म्हणजे हे पदार्थ लहान मुलांमध्ये प्रचंड लोकप्रिय आहेत. पालकही मुलंच्या हट्टापायी हे पदार्थ मुलांना देतात. मुले हे पदार्थ मिटक्या मारत खातात. कंपनीने या पदार्थात कोणतेही पौष्टिक घटक नसल्याचे मान्य करूनही पालक फास्टफुड चा हट्ट सोडत नाही. काही पदार्थात तर शरीरास हानिकारक घटक असतात तज्ज्ञांनी ते संशोधनाअंती सिद्ध करून दाखवले आहे. ज्या फास्टफुड पदार्थात शरीरास हानिकारक घटक असल्याचे सिद्ध झाले ते घटक कंपनीने काढून टाकल्याचे मान्य केले मात्र अजूनही असे अनेक पदार्थ आहेत की ज्यात शरीरास हानिकारक असणारे घटक आहेत व ते पदार्थ बाजारात  सर्रास विकले जात  आहेत. काही जगप्रसिद्ध कंपन्यांवर असे आरोप आहेत की त्यांच्या पदर्थात शरीरास हानिकारक घटक आहेत तरीही या कंपन्यांच्या फास्टफुड पदार्थांची लोकप्रियता कमी झाली नाही उलट वाढतच चालली आहे. फास्टफुडमुळे मुलांना अनेक आजरांना सामोरे जावे लागत आहे. अतिप्रमाणात फास्टफुड खाण्यात आल्यास  हृदयरोग, मधुमेह आणि स्थूलतेचा  धोका आहे. अतिप्रमाणात फास्टफुड खाणाऱ्यांना कर्करोगासारखा असाध्य आजारही होऊ शकतो असे जाणकार सांगतात त्यामुळे पालकांनी मुलांना फास्टफुड पासून दूर ठेवायला हवे. फास्टफ ुड ऐवजी दूध, पोळी, पराठे, चटणी, कडधान्यांच्या उसळी, पोहे, उपमा यासारखे पौष्टिक पदार्थ पालकांनी मुलांना खायला द्यावेत. मुलांना चविष्ट पदार्थ देण्याऐवजी पौष्टिक पदार्थ खायला देणे ही पालकांची जबाबदारी आहे.

**श्याम ठाणेदार, दौंड जिल्हा पुणे, ९९२२५४६२९५**

# दहा वर्षांत देवेंद्र फडणवीस तिसऱ्यांदा मुख्यमंत्रीपदी


महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीचे निकाल लागल्यानंतर अखेर १० दिवसांनी राज्याच्या मुख्यमंत्रीपदाचं कोडं सुटलं आहे. विधानभवनाच्या सेंट्रल हॉलमध्ये झालेल्या भाजपाच्या विधिमंडळ पक्षाच्या बैठकीमध्ये चंद्रकांत पाटील व सुधीर मुनगंटीवार यांनी देवेंद्र फडणवीसांच्या नावाचा प्रस्ताव मांडला. त्याला उपस्थित आमदारांनी अनुमोदन दिलं आणि देवेंद्र फडणवीस तिसऱ्यांदा महाराष्ट्राचे मुख्यमंत्री म्हणून शपथ घेणार हे निश्चित झालं. निकाल लागल्यानंतर भाजपाकडून सातत्याने सोशल मिडिया व राजकीय व्यासपीठांवरदेखील देवेंद्र फडणवीसच मुख्यमंत्रीपदाचे दावेदार असल्याचं बिंबवलं जात होतं. अखेर त्यांच्या नावाची घोषणा झाली.

२०१९ साली मुख्यमंत्रीपदावरून सेना-भाजपा युती तुटली, तेव्हा नाट्यमय राजकीय घडामोडी घडल्या आणि देवेंद्र फडणवीसांनी अजित पवारांसह भल्या सकाळी शपथविधी उरकला. पण अवघ्या ७२ तासांत त्यांना राजीनामा द्यावा लागला आणि सर्वात कमी काळ मुख्यमंत्री राहिल्याची नोंदही त्यांच्यानावे झाली. पण त्यावेळी विरोधी पक्षनेते म्हणून केलेल्या भाषणात त्यांनी आपण पुन्हा येणार असल्याचे संकेत शायरीच्या माध्यमातून दिले होते. मेरा पानी उतरता देख, मेरे किनारे पर घर मत बसा लेना. मैं समुंदर हूँ, लौट कर वापस आऊंगा, असं फडणवीस म्हणाले होते. त्यांनंतरही त्यांनी आपण विरोधकांकडून आखण्यात आलेलं चक्रव्यूह भेदणारे अभिमन्यू असल्याचं विधान केलं होतं.

आता देवेंद्र फडणवीस पुन्हा एकदा मुख्यमंत्री होणार हे निश्चित झाल्यानंतर आता सत्तास्थापनेमध्ये खातेवाटप आणि सत्तेचं योग्य प्रमाणात मित्रपक्षांमध्ये वाटप करणं हे मोठं आव्हान देवेंद्र फडणवीसांसमोर असणार आहे. विधिमंडळ पक्षनेतेपदी निवड झाल्यानंतर केलेल्या आपल्या भाषणात देवेंद्र फडणवीसांनी या 'तडजोडी'चा उल्लेख करताना आपल्याला सगळ्यांच्या मनातल्या सगळ्या गोष्टी पूर्ण करता येत नाहीत. पण आपण एक मोठं ध्येय घेऊन राजकारणात आलो आहोत. फक्त पदांसाठी आलेलो नाही. त्यामुळे मला पूर्ण अपेक्षा आहे की येत्या काळात काही गोष्टी आपल्या मनाप्रमाणे होतील, काही गोष्टी मनाविरुद्ध होतील. तरीही आपण सगळे व्यापक हितासाठी एकत्र काम करू, असे संकेत त्यांनी दिले.

२०१४ मध्ये देवेंद्र फडणवीस भाजपाचे महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष होते. तेव्हा कुठेही चर्चा नसताना ४४ वर्षीय देवेंद्र फडणविसांचं नाव मुख्यमंत्रीपदासाठी जाहीर करून भाजपानं सगळ्यांनाच आश्चर्याचा धक्का दिला होता. त्या निवडणुकीत भाजपाला तेव्हापर्यंतच्या राज्यातल्या सर्वाधिक म्हणजे १२२ जागा मिळाल्या होत्या. या निवडणुकीत तो आकडाही पक्षानं पार करत स्वबळावर १३२ जागा जिंकून आणल्या आणि या सगळ्याच्या केंद्रस्थानी होते देवेंद्र फडणवीस!

देवेंद्र फडणवीसांच्या पहिल्या मुख्यमंत्रीपदाच्या कार्यकाळात भाजपाला राज्यात सर्वाधिक जागा मिळाल्या होत्या. शिवसेना दुसऱ्या स्थानावर गेल्यामुळे पहिल्यांदाच युतीमध्ये मोठा भाऊ कोण? यावर चर्चा सुरू झाली होती. पण व्यापक चर्चेअंती देवेंद्र फडणवीसांच्या पुढाकारानंतर शिवसेनेला सोबत घेऊन राज्यात युतीचं सरकार आलं.



देवेंद्र फडणवीसांसाठी सर्वात जमेची बाजू होती त्यांची भाजपा प्रदेशाध्यक्ष म्हणून असलेली स्वच्छ व विश्वासार्ह प्रतिमा. मुख्यमंत्रीपदी आल्यानंतर देवेंद्र फडणवीसांनी त्यांचं खणखणीत नाणं सिद्ध करून दाखवलं. याचदरम्यान त्यांच्या नेतृत्वाखाली झालेल्या मेक इन इंडिया समिटमध्ये महाराष्ट्र सरकारनं २६०३ एमओयूंवर स्वाक्षरी केली. या करारांचं एकूण मूल्य तब्बल ८ लाख कोटींच्या घरात होतं. त्याचप्रमाणे २०१८ मध्ये 'मॅग्नेटिक महाराष्ट्र' कार्यक्रमाच्या माध्यमातून महाराष्ट्रात जवळपास १२ लाख कोटींची गुंतवणूक आली.

याचदरम्यान मराठा आरक्षणाचा मुद्दाही तापू लागला होता. पण हा मुद्दाही त्यांनी यशस्वीपणे हाताळला. मराठा आरक्षणासाठी अनेक मोर्चे काढले जात होते. काही आंदोलकांकडून आत्महत्येचं टोकाचं पाऊलही उचलण्यात येत असल्याचं दिसून येत होतं. त्यावेळी भाजपाच्या केंद्रीय नेतृत्वाकडून देवेंद्र फडणवीसांना बदलण्याचाही विचार केला जात होता असं सांगितलं जातं. मात्र, मराठा आंदोलकांशी यशस्वी चर्चा घडवून आणण्यात देवेंद्र फडणवीसांनी महत्त्वाची कामगिरी बजावली. मराठा समाजाला तेव्हा एसईबीसी प्रवर्गामध्ये आरक्षणही मंजूर करण्यात आलं. कालांतराने त्यावर स्थगिती आणण्यात आली. फडणवीस सरकारनं मिळवून दिलेलं आरक्षण विरोधी पक्षांच्या सरकारला टिकवता आलं नाही, अशी टीका सातत्याने भाजपाकडून केली जाते.

दरम्यान, देवेंद्र फडणवीसांना पक्षातूनच इतर वरीष्ठ नेत्यांकडून आव्हान दिलं जात असल्याची चर्चा मध्यंतरी पाहायला मिळाली. त्यात सर्वात मोठं नाव होतं एकनाथ खडसे यांचं. महत्त्वाचे ओबीसी नेते आणि भाजपाचे राज्यातील ज्येष्ठ नेते म्हणून एकनाथ खडसे यांचा पक्षांतर्गत प्रभाव मोठा होता. पण २०१६ मध्ये त्यांना जमीन गैरव्यवहार प्रकरणी राजीनामा द्यावा लागला. विनोद तावडे हेदेखील मुख्यमंत्रीपदाच्या शर्यतीत होते असं बोललं गेलं.

मुख्यमंत्रीपदाचा पहिला कार्यकाळ संपेपर्यंत देवेंद्र फडणवीस महाराष्ट्रातील भाजपाचे पहिल्या क्रमांकाचे महत्त्वाचे नेते म्हणून सर्वपरिचित झाले होते.

निवडणुकांनतर पुन्हा देवेंद्र फडणवीसच मुख्यमंत्री होती, असं चित्र निर्माण झालं होतं. त्याचवेळी एकनाथ खडसे, विनोद तावडे आणि चंद्रशेखर बावनकुळे यांना २०१९ च्या विधानसभा निवडणुकीत तिकीटही नाकारण्यात आलं होतं. कालांतराने विनोद तावडेंना केंद्रीय पक्ष यंत्रणेमध्ये सामावून घेण्यात आलं, तर चंद्रशेखर बावनकुळेंना २०२१ मध्ये पक्षाचं प्रदेशाध्यक्ष करण्यात आलं.

**देवेंद्र फडणवीसांच्या कारकिर्दीतला दुसरा टर्निंग पॉइंट!**

दरम्यान, देवेंद्र फडणवीसांच्या राजकीय कारकिर्दीतला दुसरा टर्निंग पॉइंट २०१९ मध्ये आला. सेना-भाजपा युतीला १६१ जागा मिळाल्या होत्या. पण तरीदेखील सत्ता स्थापन होऊ शकली नाही. मुख्यमंत्रीपदावरून दोन्ही पक्षांमध्ये झालेल्या वादाच्या पार्श्वभूमीवर युती तुटली आणि मविआचा जन्म झाला. १०५ आमदार एकट्याच्या बळावर जिंकून आणल्यानंतरही भाजपाला सत्तेबाहेर राहावं लागण्याची चिन्हं दिसू लागली.

त्यापुढच्या महिन्याभरात महाराष्ट्रानं अनेक नाट्यमय घडामोडी पाहिल्या. देवेंद्र फडणवीसांनी अजित पवारांसोबत भल्या सकाळी घेतलेली शपथ हा त्या घडामोडींचा सर्वोच्च बिंदू ठरला. चार दिवसांत अजित पवारांनी माघार घेताच अल्पमतात आलेल्या देवेंद्र फडणवीसांनी मुख्यमंत्रीपदाचा राजीनामा दिला. राज्यात मविआचं सरकार आलं. पण करोना ओसरताच पुन्हा राजकीय घडामोडींना वेग आला. एकनाथ शिंदेंनी बंडखोरी करत ४० आमदार आपल्यासोबत आणले. उद्धव ठाकरे सरकार कोसळलं आणि शिंदेंच्याच नेतृत्वाखाली राज्यात पुन्हा युतीचं सरकार आलं. पण या सगळ्या घडामोडींमध्ये सर्वांचं लक्ष होतं ते देवेंद्र फडणवीसांकडे.

**उपमुख्यमंत्रीपदाचा धक्का!**

नव्या सरकारमध्ये देवेंद्र फडणवीसच मुख्यमंत्री होतील असं बोललं जात होतं. पण ऐनवेळी चक्र फिरली आणि देवेंद्र फडणवीसांनी सरकारमध्ये उपमुख्यमंत्री म्हणून सहभागी होण्याचं मान्य केलं. पण त्याचवेळी पडद्यामागच्या हालचाली चालूच होत्या २०२३ मध्ये राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये फूट पडली आणि अजित पवारही युतीमध्ये उपमुख्यमंत्री म्हणून सहभाही झाले.

**लोकसभा निवडणुकीतील पीछेहाट**

लोकसभा निवडणुकीत राज्यात भाजपाला अवघ्या ९ जागा मिळाल्या. त्यामुळे देवेंद्र फडणवीसांच्या नेतृत्वावर मोठं प्रश्नचिन्ह उपस्थित करण्यात आलं. खुद्द फडणवीसांनीही निकालांनतरच्या पत्रकार परिषदेत उपमुख्यमंत्रीपदाचा राजीनामा देऊन पक्षीय संघटनेत काम करण्याची तयारी दर्शवली होती. मात्र, केंद्रीय नेतृत्वानं त्यांचा राजीनामा स्वीकारला नसल्याचं सांगितलं जातं. मात्र, गेल्या सहा महिन्यांत विधानसभा निवडणुकांच्या दृष्टीने देवेंद्र फडणवीसांनी आख्खा महाराष्ट्र पिंजून काढला. राज्यभरात फडणवीसांनी जवळपास ७५ प्रचारसभा घेतला. सर्व ३६ जिल्ह्यांचे दौरे केले. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाशी जुळवून घेत आपापसांत समन्वयाने संघाचीही मदत घेतली. महायुतीच्या माध्यमातून यक्षप्रश्न ठरलेले जागावाटप आणि उमेदवारी वाटपाचे मुद्दे निकाली काढले. पण आता फडणवीसांसमोर खातेवाटप आणि मंत्रीपद वाटपाचा मुद्दा महत्त्वाचा असणार आहे. अजित पवारांनी आधीच पाठिंबा जाहीर केला असला, तरी शिंदे गटाकडून विशिष्ट खात्यांची मागणी फडणवीसांकडे करण्यात आल्याचं सांगितलं जात आहे. या पार्श्वभूमीवर देवेंद्र फडणवीसांना तिन्ही प्रमुख पक्षांमध्ये खातेवाटपासाठी समन्वय साधणं आव्हानात्मक ठरण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

## उपमुख्यमंत्री झालेला नेता मुख्यमंत्री होत नाही हा प्रघात मोडला

देवेंद्र फडणवीस यांच्या नावावरचा पहिला रेकॉर्ड आहे तो तीन वेळा मुख्यमंत्री होण्याचा. २०१४ मध्ये देवेंद्र फडणवीस हे महाराष्ट्राचे मुख्यमंत्री झाले. २०१९ मध्ये ७२ तास म्हणजेच तीन दिवसांसाठी देवेंद्र फडणवीस मुख्यमंत्री झाले होते. देवेंद्र फडणवीस यांनी आज त्यांच्या भाषणातही हा उल्लेख केला. की त्यांना सलग तीनदा पंतप्रधान नरेंद्र मोदींना मुख्यमंत्री होण्याची संधी दिली. मी २०१९ मध्ये तीन दिवसच मुख्यमंत्री राहू शकलो असंही देवेंद्र फडणवीस मिळाले. यानंतर आता तिसऱ्यांदा मुख्यमंत्री होण्याचा विक्रम देवेंद्र फडणवीस करत आहेत. शरद पवारांच्या नंतर तीनदा मुख्यमंत्री होण्याचा विक्रम त्यांच्या नावावर नोंदवला गेला आहे.
देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वात तीन विधानसभा निवडणुका लढवण्यात आल्या. या तिन्ही निवडणुकांमध्ये देवेंद्र फडणवीस यांनी १०० हून अधिक आमदार निवडून आणले. एखाद्या पक्षाचे आमदार सलग तीनवेळा निवडून आणणं ही किमया फक्त देवेंद्र फडणवीस यांनी साधली आहे. आपण जाणून घेऊ कुठल्या वर्षी भाजपाचे किती आमदार होते.

**कुठल्या वर्षी भाजपाचे किती आमदार?**

२०१४ ची विधानसभा निवडणूक - १२२ आमदार
२०१९ ची विधानसभा निवडणूक - १०५ आमदार
२०२४ ची विधानसभा निवडणूक - १३२ आमदार

विशेष उल्लेखनीय बाब म्हणजे २०१९ मध्ये भाजपाला विरोधी पक्षात बसावं लागलं. तसंच जेव्हा २०२२ मध्ये महायुतीचं सरकार आलं तेव्हा भाजपाला मुख्यमंत्रिपद मिळालं नाही. तरीही १०५ पैकी एकही आमदार भाजपा सोडून गेला नाही. या गोष्टीचा उल्लेख देवेंद्र फडणवीस यांनीही केला. देवेंद्र फडणवीस यांच्या नावे असलेला तिसरा विक्रमही खास असाच आहे.
महाराष्ट्राच्या राजकारणात उपमुख्यमंत्री झालेला नेता मुख्यमंत्री होत नाही हा प्रघात मोडण्याचा रेकॉर्डही देवेंद्र फडणवीस यांच्या नावे नोंदवला गेला आहे. याआधी छगन भुजबळ, अजित पवार, आर. आर. पाटील, गोपीनाथ मुंडे यांच्यासह अनेक दिग्गज जे उपमुख्यमंत्री या पदापर्यंत पोहचले पण मुख्यमंत्री होऊ शकले नाहीत. त्यामुळे राजकारणात असा प्रघातच पडला होता की उपमुख्यमंत्री झालेला नेता मुख्यमंत्री होत नाही. देवेंद्र फडणवीस हे २०२२ मध्ये उपमुख्यमंत्री झाले. आता २०२४ मध्ये प्रचंड बहुमतासह मुख्यमंत्री होणार आहेत. त्यामुळे त्यांच्या नावे हा पारंपरिक प्रघात मोडण्याचा रेकॉर्डही नोंदवला गेला आहे.

## उद्धव ठाकरे, शरद पवार, प्रकाश आंबेडकर यांना राजशिष्टाचार विभागाकडून शपथविधीचे निमंत्रण

**मुंबई -** देवेंद्र फडणवीस पुन्हा एकदा महाराष्ट्राचे मुख्यमंत्री होणार असून महायुतीचा शपथविधी सोहळा आझाद मैदानावर पार पडणार आहे. या शपथविधी सोहळ्याला पंतप्रधान नरेंद्र मोदी देखील उपस्थित असणार आहेत. भाजपच्या विधीमंडळातील गट नेतेपदी आणि देवेंद्र फडणवीस यांची एकमताने निवड करण्यात आली. त्यामुळे देवेंद्र फडणवीसच महाराष्ट्राचे मुख्यमंत्री होणार हे स्पष्ट झाले आहे.

दरम्यान, राजशिष्टाचार विभागाकडून ठाकरे गटाचे प्रमुख उद्धव ठाकरे , राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षाचे सर्वेसर्वा शरद पवार आणि वंचित बहुजन आघाडीचे प्रमुख प्रकाश आंबेडकर या सर्वांना उद्याच्या शपथविधीसाठी निमंत्रण देण्यात आल्याची सूत्रांची माहिती आहे. उद्या साडेपाच वाजता आझाद मैदान येथे शपथविधी सोहळा पार पडणार आहे.  यामध्ये विरोधी पक्षनेते  त्यासोबतच राज्यातील इतर राज्याचे पक्षप्रमुख पक्ष अध्यक्ष यांना सुद्धा राज शिष्टाचार विभागाकडून निमंत्रण देण्यात आला आहे

राष्ट्रवादी काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष अजित पवारांच्या शपथविधीसाठी पक्षाचे इतर राज्यांचे प्रमुखही लावणार हजेरी लावणार आहेत. दिल्ली, मणीपूर, नागालँड आणि मेघालय राज्याचे प्रमुख आज मुंबईत येणार दाखल होणार आहेत. महायुतीच्या शपथविधी समारंभात तिन्ही पक्षाचे राष्ट्रीय पातळीवर नेते लावणार हजेरी लावणार आहेत.

मुंबईच्या आझाद मैदानात महायूतीच्या शपथविधीसाठी मुंबई पोलिसांकडून राहणार चोख पोलिस बंदोबस्त असणार आहे. शपथविधी सोहळ्या दरम्यान होणारी गर्दी लक्षात घेता मुंबई पोलिसांकडून  अडिच हजारहून अधिक पोलिस बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे. शपथविधी दरम्यान १० पोलिस उपायुक्त, २० सहाय्यक पोलिस आयुक्त, १०० पोलिस निरीक्षक, १५० सहाय्यक व पोलिस उपनिरीक्षकांसह १५०० हून अधिक पोलिस कर्मचारी बंदोबस्तासाठी उपस्थित राहणार आहेत. याच बरोबर सशस्र पोलिस दल,  टास्क फोर्ससह इतर सुरक्षा यंत्रणाही सज्ज असणार आहेत. या शिवास आझाद मैदान परिसर हा नो फ्लाईंग झोन म्हणून घोषित करण्यात आला असून आजू बाजूच्या उंच इमारतींवरही पोलिस तैनात असणार आहेत. शिवाय ड्रोन द्वारेही पोलिसांची करडी नजर असणार आहे.

## राज्याच्या आत्तापर्यंतच्या मुख्यमंत्र्यांची यादी

| क्र. | नाव | वर्ष | कार्यकाळ |
|---|---|---|---|
| १ | यशवंतराव चव्हाण | १ मे १९६० ते १९ नोव्हेंबर १९६२ | २ वर्षं ३ दिवस |
| २ | मारोतवार कन्नमवार | २० नोव्हे. १९६२ ते २४ नोव्हें. १९६३ | १ वर्षं ४ दिवस |
| ३ | पी. के. सावंत | २५ नोव्हें. १९६३ ते ५ डिसें. १९६३ | १० दिवस |
| ४ | वसंतराव नाईक | ५ डिसें. १९६३ ते २१ फेब्रु. १९७५ | ११ वर्षं ७८ दिवस |
| ५ | शंकरराव चव्हाण | २१ फेब्रु. १९७५ ते १७ मे १९७७ | २ वर्षं ८५ दिवस |
| ६ | वसंतदादा पाटील | ५ मार्च १९७८ ते १८ जुलै १९७८ | १ वर्षं ६२ दिवस |
| ७ | शरद पवार | १८ जुलै १९७८ ते १७ फेब्रु. १९८० | १ वर्षं २१४ दिवस |
|  | राष्ट्रपती राजवट | १७ फेब्रुवारी १९८० ते ८ जून १९८० | ११२ दिवस |
| ८ | ए. आर. अंतुले | ९ जून १९८० ते २१ जाने. १९८२ | १ वर्षं २२६ दिवस |
| ९ | बाबासाहेब भोसले | २१ जाने. १९८२ ते २ फेब्रु. १९८३ | १ वर्षं १२ दिवस |
| १० | वसंतदादा पाटील | २ फेब्रु. १९८३ ते ३ जून १९८५ | २ वर्षं १२१ दिवस |
| ११ | शिवाजीराव पाटील निलंगेकर | ३ जून १९८५ ते १२ मार्च १९८६ | २८२ दिवस |
| १२ | शंकरराव चव्हाण | १२ मार्च १९८६ ते २६ जून १९८८ | २ वर्षं १०६ दिवस |
| १३ | शरद पवार | २६ जून १९८८ ते २५ जून १९९१ | २ वर्षं ३६४ दिवस |
| १४ | सुधाकरराव नाईक | २५ जून १९९१ ते ६ मार्च १९९३ | १ वर्षं २५४ दिवस |
| १५ | शरद पवार | ६ मार्च १९९३ ते १४ मार्च १९९५ | २ वर्षं ८ दिवस |
| १६ | मनोहर जोशी | १४ मार्च १९९५ ते १ फेब्रु. १९९९ | ३ वर्षं ३२४ दिवस |
| १७ | नारायण राणे | १ फेब्रु. १९९९ ते १८ ऑक्टो. १९९९ | २५९ दिवस |
| १८ | विलासराव देशमुख | १८ ऑक्टो. १९९ ते १८ जाने. २००३ | ३ वर्षं ९२ दिवस |
| १९ | सुशीलकुमार शिंदे | १८ जाने. २००३ ते १ नोव्हें. २००४ | १ वर्षं २८८ दिवस |
| २२ | विलासराव देशमुख | १ नोव्हें. २००४ ते ८ डिसें. २००८ | ४ वर्षं ३७ दिवस |
| २१ | अशोक चव्हाण | ८ डिसें. २००८ ते ११ नोव्हें. २०१० | १ वर्षं ३३८ दिवस |
| २२ | पृथ्वीराज चव्हाण | ११ नोव्हें. २०१० ते २८ सप्टें. २०१४ | ३ वर्षं ३२१ दिवस |
| राष्ट्रपती राजवट |  | २८ सप्टें. २०१४ ते ३० ऑक्टो. २०१४ | ३२ दिवस |
| २३ | देवेंद्र फडणवीस | ३१ ऑक्टो. २०१४ ते १२ नोव्हें. २०१९ | ५ वर्षं १२ दिवस |
| राष्ट्रपती राजवट |  | १२ नोव्हें. २०१९ ते २३ नोव्हें. २०१९ | ११ दिवस |
| २४ | देवेंद्र फडणवीस | २३ नोव्हें. २०१९ ते २८ नोव्हें. २०१९ | ५ दिवस |
| २५ | उद्धव ठाकरे | २८ नोव्हें. २०१९ ते ३० जून २०२२ | २ वर्षं २१४ दिवस |
| २६ | एकनाथ शिंदे | ३० जून २०२२ ते २६ नोव्हें. २०२४ | २ वर्षं १४९ दिवस |
| २७ | देवेंद्र फडणवीस | - | - |

# मतदान टक्केवारी वाढविण्यासाठी भरीव योगदानाबद्दल जिल्हाधिकाऱ्यांचा सन्मान

## सामाजिक संस्थांपासून व्यापारी महासंघापर्यंत सर्वांनी लोकशाही मजबूत करण्याचे कार्य केले- डॉ. पांचाळ

**जालना । प्रतिनिधी** - जालना जिल्ह्याच्या नागरिकांनी प्रगल्भ लोकशाही मूल्यांची जाणीव ठेवत मतदान प्रक्रियेत सक्रिय सहभाग घेतला, ही कौतुकास्पद बाब आहे. सामाजिक संस्थांपासून व्यापारी महासंघापर्यंत सर्वांनी एकत्र येत लोकशाही मजबूत करण्याचे कार्य केले, त्यामुळेच मतदानाच्या टक्केवारीत जालना जिल्हा मराठवाड्यात प्रथम तर राज्यात तिसऱ्या स्थानावर राहिला, असे प्रतिपादन जिल्हाधिकारी डॉ. श्रीकृष्णनाथ पांचाळ यांनी आज बुधवार दि. ४ डिसेंबर रोजी येथे बोलताना केले.

विधानसभा निवडणुकीत जालना जिल्ह्याने मतदानाच्या उच्च टक्केवारीत महाराष्ट्रात तृतीय आणि मराठवाड्यात पहिल्या क्रमांकावर झेप घेतली आहे. या उल्लेखनीय कामगिरीबद्दल जिल्हाधिकारी डॉ. श्रीकृष्णनाथ पांचाळ यांचा कॅट अंतर्गत व्यापारी महासंघ जिल्हा जालना यांच्यावतीने विशेष सन्मान करण्यात आला, त्यावेळी सत्काराला उत्तर देताना डॉ. पांचाळ बोलत होते. ते पुढे म्हणाले की, हा पुरस्कार माझ्यासाठी नव्हे, तर जिल्ह्याच्या प्रत्येक नागरिकासाठी आहे. यापुढेही आपण असेच संघटित प्रयत्न करत राहू.

सन्मान पत्राचे वाचन सतीश पंच यांनी केले. सन्मान सोहळ्याचा उद्देश विषद करताना ते म्हणाले की, व्यापारी महासंघाने जालना जिल्ह्याच्या नागरिकांमध्ये मतदानाबाबत जागरूकता निर्माण करण्यासाठी केलेल्या प्रयत्नांबद्दल आणि जिल्हाधिकाऱ्यांच्या नेतृत्वाखाली झालेल्या उल्लेखनीय मतदानासाठी कौतुक करण्यासाठीचा हा सन्मान सोहळा आहे. जिल्ह्याच्या प्रगतीसाठी पुढील काळात सामूहिक प्रयत्न करण्याचा संकल्प आपण सर्व मिळून करूयात, अशी साद त्यांनी घातली.

कॅटचे मराठवाडा अध्यक्ष हस्तीमल बंब यांनी मतदानाची टक्केवारी वाढविण्यासाठी प्रयत्न करणारे जिल्हाधिकारी डॉ. पांचाळ, जिल्ह्यातील व्यापारी आणि नागरिकांचे आभार मानले आणि व्यापारी महासंघाची लोकशाहीसाठी बांधिलकी अधोरेखित केली.

याप्रसंगी व्यापारी महासंघाचे पदाधिकारी दीपक भुरेवाल, रामकुवर अग्रवाल, संजय लव्हाडे, अशोक हुरगट, अशोक मिश्रा, महिंद्रा कुमार भक्कड, किशन भक्कड, अनिल लोढा, सुनील रुणवाल, पुरुषोत्तम अग्रवाल, श्रीधर देशपांडे, कैलास इघारे, अनिल व्यवहारे, ईन्नरव्हील क्लब ऑफ जालना होरायझनच्या अध्यक्ष ॲड. अश्विनी धन्नावत, सचिव ॲड पिंकी लड्ढा आदींची उपस्थिती होती.



### डॉ. पांचाळ यांच्या प्रभावी नेतृत्वामुळेच मतदानात जिल्हा राज्यात तिसऱ्या स्थानी-सतीश पंच

कॅटचे राज्य उपाध्यक्ष आणि जालना व्यापारी महासंघाचे अध्यक्ष सतीश पंच म्हणाले की, जालना जिल्ह्याने मतदान प्रक्रियेत नेत्रदीपक कामगिरी करत मराठवाड्यात आपले नाव उज्ज्वल केले आहे. जिल्हाधिकारी डॉ. पांचाळ यांच्या प्रभावी नेतृत्वामुळेच हे शक्य झाले. त्यांच्या प्रोत्साहनाने जिल्ह्यातील व्यापारी संघटना, सेवाभावी संस्था आणि नागरिकांनी अतिशय प्रेरणादायी काम केले. व्यापारी महासंघाने सामाजिक उत्तरदायित्व जपून मतदान जनजागृती मोहिमेत मोलाचे योगदान दिले आहे. मतदानाचे हे यश म्हणजे केवळ एक पाऊल आहे. जालना जिल्हा इतर अनेक सामाजिक व आर्थिक क्षेत्रांतही अशीच प्रगती करेल. जिल्हाधिकाऱ्यांच्या नेतृत्वाखाली जिल्ह्याचा नावलौकिक उंचावत राहील, अशी खात्री आहे, असा विश्वास सतीश पंच यांनी व्यक्त केला.

# डॉक्टर्स असोसिएशनच्या अध्यक्षपदी डॉ. अरुण खैरे तर सचिवपदी डॉ. अर्जुन शेळके यांची एकमताने बिनविरोध

**बदनापूर । प्रतिनिधी** - तालुक्यातील वैद्यकीय सेवा बजावणाऱ्या डॉक्टरांना एकत्रित करणार्या डॉक्टर्स असोसिएशनची स्थापना केलेली असून या असोसिएशनमार्फत विविध सामाजिक कार्यक्रम आयोजित करण्यात येतात. असोसिएशनच्या नुकत्याच झालेल्या बैठकीत कार्यकारिणीची नव्याने बांधणी करण्यात येऊन अध्यक्षपदी डॉ. अरुण शंकरराव खैरे तर सचिव पदी डॉ. अर्जुन शेळके यांची एकमताने बिनविरोध निवड करण्यात आली.



बदनापूर तालुक्यातील वैद्यकीय सेवा देणार्या सर्व डॉक्टर्सनी एकत्रित येऊन संघटना स्थापन केलेली असून मागील वर्षी जाहीर झालेल्या कार्यकारिणीने उत्कृष्ट काम करत असोसिएशनच्या कामाचा ठसा उमटवला होता. नुकतीच तालुक्यातील सर्व डाक्टर्सची बैठक झाली. या बैठकीत मागील वर्षी झालेल्या कामाचा आढावा घेण्यात आला. मागील कार्यकारिणीने केलेल्या उत्कृष्ट कामामुळे तिच कार्यकारिणी कायम ठेवण्याचा निर्णय एकमताने घेण्यात आला. तालुका कार्यकारिणी जाहीर करून असोसिएशनच्या माध्यमातून सामाजिक कार्य आणखी जोमाने करण्याचे ठरवण्यात आले.

या वेळी जाहीर झालेल्या कार्यकारिणीमध्ये अध्यक्षपदी डॉ. अरुण शंकरराव खैरे, उपाध्यक्षपदी डॉ. किरण जर्हाड, सचिवपदी डॉ. अर्जुन शेळके. तर कोषाध्यक्ष म्हणून डॉ. गौरव तातेड यांची निवड करण्यात आली. डॉ. अविनाश गाभणे, डॉ. संतोष वाघ व डॉ. शिवा गायकवाड यांनी आहे त्याच कार्यकारिणीच्या पदाधिकार्यांना कायम ठेवावे, त्यांनी चांगले काम केले आहे असा प्रस्ताव बैठकीत ठेवला असता उपस्थितांनी अनुमोदन देत सदरील कार्यकारिणी बिनविरोध जाहीर केली. याच वेळी क्रीडा सचिव म्हणून डॉ. प्रदीप कदम, सांस्कृतिक सचिव (महिला प्रतिनिधी) डॉ. अस्मिता खैरे, डॉ. अश्विनी गायकवाड, डॉ. कृष्ण सरोदे, डॉ. अनुराधा पाटील, डॉ. मनोज वाळके यांची निवड करण्यात आली. असोसिएशनचे प्रमुख मार्गदर्शक म्हणून डॉ. रामेश्वर पाटील, डॉ. कुंडकर, डॉ. सुरेश कासट, डॉ. जयप्रकाश दरक, डॉ. खांडेभराड, डॉ. हरीश तातेड आदी काम पाहणार आहेत. या वेळी डॉ. सचिन उकीर्डे, डॉ. कैलास बनकर, डॉ. सरोदे, डॉ. प्रदीप कदम, डॉ. रणजित जाधव, डॉ. खांडेभराड, डॉ. सुहास भागवत, डॉ. राहुल जैस्वाल, डॉ. शिवा गायकवाड, डॉ.बदापूरकर, डॉ. गीते, डॉ. खोतकर, डॉ. राजु पवार, डॉ. ओम ढाकणे, डॉ. घनघाव, डॉ. प्रवीण पवार, डॉ. आव्हाड, डॉ. देशमुख, डॉ. राजपूत, डॉ. बोराडे, डॉ. मेहेर आदींसह तालुकाभरातून ६५ हून अधिक डॉक्टरांची उपस्थिती होती.

# सोशल मीडिया पोस्ट मेकिंग स्पर्धा

**जालना** - सर्व सामान्यामध्ये एड्स , एचआयव्ही, गुप्तरोग आदि आजाराविषयी जनजागृती होण्यासाठी जिल्हा एड्स प्रतिबंध व नियंत्रण पथकाकडून नागरिक व विद्यार्थ्यांसाठी सोशल मीडिया पोस्ट मेकिंग स्पर्धेचे आयोजन दि.९ डिसेंबर २०२४ पर्यंत इंस्टाग्राम व फेसबुकवर करण्यात आलेली पोस्ट करावी. पोस्ट मेकिंग स्पर्धा वय वर्षे १८ पुर्ण झालेल्या व्यक्ती, युवकांसाठी खुली असून प्रथम पारितोषिक १ हजार ५०० रुपये, द्वितीय पारितोषिक १ हजार रुपये, आणि तृतीय पारितोषिक ५०० रुपये असे राहील. पोस्ट केलेले क्रिएटिव्ह dpojalnamahasacs.org या ई-मेलवर किंवा ९४२२१९२१५२ या व्हॉटसअप क्रमांकावर पाठवावे. असे आवाहन जिल्हा शल्य चिकित्सक, जालना यांनी प्रसिध्दीपत्रकाद्वारे केले आहे.

# खेळामुळे शरीर-मन निरोगी बनून सांघिक भावना वाढीस लागते- प्रा. चिंचखेडकर

## ए टू झेड स्कूलमध्ये क्रीडा दिन उत्साहात साजरा

**जालना । प्रतिनिधी** - खेळामुळे शरीर-मन निरोगी बनून सांघिक भावना वाढीस लागते. या प्रकारचे ए टू झेड स्कूलचे कार्य हे ए टू झेड व्हिटॅमिनसारखेच आहे, असे प्रतिपादन प्रा. श्रीकांत चिंचखेडकर यांनी येथे बोलताना केले.

ए टू झेड स्कूलमध्ये क्रीडा दिन उत्साहात साजरा करण्यात आला, त्याप्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून प्रा. चिंचखेडकर बोलत होते. व्यासपीठावर ए टू झेड स्कूलचे संचालक सुरेंद्र मुनोत आणि सौ. सीमा मुनोत यांची उपस्थिती होती. याप्रसंगी प्रा. श्रीकांत चिंचखेडकर यांनी विद्यार्थी आणि बाल मित्रांशी संवाद साधला. त्यांनी विद्यार्थ्यांना खेळाचे महत्त्व आणि जीवनातील त्याचे फायदे उलगडून सांगितले. खेळाचे शारीरिक व मानसिक आरोग्यासाठी असलेले महत्त्व समजावले. स्वामी विवेकानंद, छत्रपती शिवाजी महाराज, लोकमान्य टिळक आणि बाल हनुमान यांचे दाखले देत खेळांमधून मिळणाऱ्या मूल्यांचे उदाहरण दिले. खेळ मनाच्या शुद्धतेसाठी, टीमवर्कच्या वाढीसाठी आणि निरोगी शरीर-मनासाठी अत्यावश्यक आहे. खेळाच्या माध्यमातून जीवनातील आव्हानांवर मात करण्याची क्षमता विकसित होते. स्वराज्य स्थापनेसाठी छत्रपती शिवरायांनी बालपणी खेळलेल्या लुटूपुटीच्या लढायांनी त्यांचे भविष्य घडवले, असे त्यांनी सांगितले. विद्यार्थ्यांना प्रोत्साहन देताना त्यांनी सांघिक भावना, खेळाडू वृत्ती आणि आत्मनिर्भरतेचे महत्त्व पटवून दिले. ए टू झेड स्कूलचे संचालक सुरेंद्र मुनोत आणि संचालिका सौ. सीमा मुनोत यांच्या नेतृत्वाखाली राबविल्या जाणाऱ्या शैक्षणिक व क्रीडा उपक्रमांचे विशेष कौतुक केले. त्यांच्या उपक्रमांमुळे विद्यार्थी सुदृढ, सतेज आणि आत्मविश्वासू बनत आहेत, असे ते म्हणाले.




विद्यार्थ्यांचे शैक्षणिक आणि क्रीडा क्षेत्रात यश सुनिश्चित करण्यासाठी ए टू झेड स्कूल असेच नाविन्यपूर्ण उपक्रम राबवत राहील, अशी ग्वाही शाळेच्या संचालिका सौ. सीमा मुनोत यांनी दिली. याप्रसंगी शिक्षिका सौ. राखी आबड, सौ. नीलिमा देसरडा, सौ. शैला चिंचखेडकर इतर शिक्षक आणि पालकांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सुरभी मुनोत यांनी केले तर आभार सौ. सीमा मुनोत यांनी मानले.

# जिल्हाधिकारी डॉ. पांचाळ यांनी घेतला जिल्हा वार्षिक योजनेचा आढावा



**जालना । प्रतिनिधी** - सन २०२४-२५ अंतर्गत जिल्हा वार्षिक योजना (सर्वसाधारण) जिल्हाधिकारी डॉ. श्रीकृष्ण पांचाळ यांनी आज सविस्तर आढावा घेतला. यावेळी त्यांनी विविध शासकीय विभागानी योजनाकरीता केलेल्या खर्चाची माहिती घेतली. जिल्हा वार्षिक योजनेतून केली जाणारी कामे वेळेत पुर्ण करुन उपलब्ध निधी खर्च करण्याचे निर्देश त्यांनी सर्व विभागप्रमुखांना यावेळी दिले.

जिल्हाधिकारी कार्यालयातील महसूल भवन येथे आयोजित बैठकीला जिल्हाधिकारी डॉ. श्रीकृष्ण पांचाळ अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी शिरीष बनसोडे, जिल्हा नियोजन अधिकारी श्री. सूर्यवंशी यांच्यासह सर्व विभागप्रमुखांची उपस्थिती होती.

यावेळी जिल्हाधिकारी डॉ. पांचाळ यांनी सन २०२४-२५ मधील कामांची स्थिती जाणून घेत, झालेल्या खर्चाची माहिती घेतली. तसेच अपुर्ण कामांची देखील स्थिती जाणून घेतली. प्रलंबित कामे लवकर पुर्ण करण्याच्या सूचना त्यांनी केल्या. या आर्थिक वर्षात विभागांना मंजूर निधी, तांत्रिक व प्रशासकीय मान्यता तसेच खर्च व कामांची प्रगती यांचा आढावा देखील त्यांनी यावेळी घेतला. सर्व विभागांनी मंजूर निधी आर्थिक वर्षात खर्च करणे आवश्यक आहे. ज्या विभागांच्या प्रशासकीय मान्यता प्रलंबित आहे, त्यांनी त्या तातडीने प्राप्त करून घ्याव्यात. निधी वेळेत खर्च करण्याची जबाबदारी संबंधीत विभागांची असून निधी अखर्चीक राहणार नाही, याची दक्षता घ्यावी. योजनेतून कामे करत असतांना ती वेळेत होण्यासोबतच गुणवत्तापुर्ण होतील याची दक्षता घ्यावी, असे ही यावेळी जिल्हाधिकारी डॉ.पांचाळ यांनी सांगितले.

# दोनपेक्षा अधिक मुले; डॉ. भागवत यांच्या वक्तव्याचे स्वागत परंतु...

रविवार दिनांक १ डिसेंबर २०२४ ला सरसंघचालक मोहन भागवत यांनी लोकसंख्येच्या दरात घट होत असल्याची चिंता व्यक्त केली. त्याच अनुषंगाने प्रत्येकाला दोन पेक्षा अधिक मुले असावीत असे विधान त्यांनी रविवारला नागपूरातील एका कार्यक्रमात केले याचे मी स्वागत करतो. कारण एकच मुलगा किंवा मुलगी रहाली तर काका-काकु,मावशी,आत्या, मामा- मामी,भाऊ-बहीण हे नाते हळूहळू लुप्त होतील. ज्याप्रमाणे जंगल कटाईमुळे अनेक प्रजातीचे वृक्ष लुप्त झालीत. त्याचप्रकारे बदलते हवामान व वाढते प्रदुषणामुळे अनेक पशुपक्षी सुध्दा लूप्त झालेत.याचप्रकारे आपण एक किंवा दोन अपत्यांवर थांबलो तर आपले अनेक रक्ताचे नाते संपुष्टात येईल हेही तितकेच सत्य आहे.भारताचा आदर्श प्रजनन दर २.१ इतका आहे.याचाच अर्थ एका महिलेने तिच्या जीवनकाळात सरासरी दोनपेक्षा अधिक मुलांना जन्म द्यायला हवा.हा आकडा जागतिक आरोग्य संघटनेने निश्चित केला आहे.असे न झाल्यास लोकसंख्येचे संतुलन बिघडू शकते. लोकसंख्याचे कमी होण्याचे प्रमाण असेच राहिल्यास अनेक भाषा,धर्म आणि संस्कृती नामशेष होतील असे डॉ.मोहन भागवत यांचे म्हणणे आहे. ही बाब सत्य आहे यात दुमत नाही. परंतु सध्याची पिढी एक किंवा दोनच अपत्य का ठेवत आहे याचाही विचार मोहन भागवतांनी करायला हवा.पुर्वी एका महिलेला तीन ते सहा मुले किंवा त्यापेक्षा जास्त असायची. कारण त्याकाळी भरपूर शेती,खर्च कमी, रहाण्याची सुखसुविधा,त्याकाळी संयुक्त कुटुंब व्यवस्था होती, त्याकाळी जास्त अपत्याचे कारण म्हणजे ज्या कुटुंबात जेवढे जास्त मुल-मुली तेवढाच मोठा आधार कामाच्या बाबतीत कुटुंबाला मिळत असे.त्यामुळे गेली २० वर्षे पुर्वीच्या काळाचा विचार केला तर एका कुटुंबात तीन ते सहा मुले असायची.परंतु गेल्या दहा ते पंधरा वर्षांच्या काळात महागाई,मुलांच्या शिक्षणासाठी लागणारा खर्च, कुटुंबासाठी रहाण्याच्या घरामध्ये अपुरी जागा व आरोग्यासाठी लागणारा अवाढव्य खर्च कुटुंबाला झेपत नसल्याने हळूहळू सर्वसामान्य व सुशिक्षित वर्ग एक किंवा दोन अपत्यांवरच समाधान मानायला लागला.कारण वाढती महागाई,मुलांचे संगोपन व्यवस्थित व्हावे व शिक्षणाचा खर्च आपल्याला पेलला पाहिजे या उद्देशाने सध्याची पीढी एक किंवा दोन मुल जन्माला घालतात यात आपण कोणालाही दोषी ठरवू शकत नाही. कारण मुले जन्माला घालतांना त्यांच्या भविष्याचा विचार पालकांनाच करावा लागतो.कारण पुढील येणाऱ्या काळातील संपूर्ण जबाबदारी,उन्हाळे-पावसाळे यावर मात करून कुटुंबाला योग्य मार्गावर आणण्याची जबाबदारी आई-वडिलांवर असते.हीबाब तितकीच सत्य आहे की एक किंवा दोन मुले जन्माला घातल्याने काका-काकु, मामा-मामी, मावशी,आत्या या नात्यांना पुर्ण विराम लागु शकतो यात दुमत नाही.परंतु एक किंवा दोनपेक्षा जास्त मुले जन्माला घातली आणि त्यांचे पालनपोषण योग्यरीत्या झाले नाही तर त्या कुटुंबावर गंभीर परिणाम होतो व अशा परिस्थितीत आत्महत्येची सुध्दा पाळी येवू शकते यालाही नाकारता येत नाही.कारण प्रत्येकांना वाटते की माझा मुलगा किंवा मुलगी डॉक्टर, इंजिनिअर, पायलट,आयएएस,आयपीएस, कलेक्टर किंवा क्लास वन अधिकारी किंवा क्लास टु अधिकारी व्हावे या पध्दतीने आईवडील आपआपल्या परीन शिकवितो व त्या पध्दतीने त्या मुलांवर शिक्षणासाठी झेपेल असा पध्दतीने काटकसर करून खर्च करतो त्या पध्दतीने तो ठरवितो की आपण जर जास्त मुले जन्माला घातली तर त्यांचे शिक्षण होईल का?असा प्रश्न सर्वसामान्यांनपुढे उपस्थित होतो.त्यामुळे आजची पिढी एक किंवा दोन अपत्यांवर संतुष्ट व समाधानी रहातात. आज मुलगा दोन ते तीन वर्षांचा झाला की त्याला नर्सरीमध्ये टाकल्या जाते तेव्हा पासून मुलांच्या शिक्षणाच्या अवाढव्य खर्चाला सुरूवात होते आणि ग्रॅज्युएशन पुर्ण होईपर्यंत मुलांवर लागणारा खर्च लाखोंच्या घरात जातो. जास्त अपत्य जन्माला घातले तर एवढा पैसा देणार कोण? किंवा येणार कोठुन?असाही प्रश्न उद्भवतो.आज वाढते प्रदुषण व बदलत्या हवामानामुळे अनेक पशुपक्षी लुप्त होण्याच्या मार्गावर आहेत तर जंगल कटाईमुळे अनेक वनस्पती नामशेष होण्याच्या मार्गावर आहेत तर दुसरीकडे बुध्दीजीवी मानव प्राणी वाढत्या महागाईमुळे,तुटपुंजा पगार,वाढता खर्च, बेरोजगारीचा प्रश्न,वाढते शहरीकरण व शिक्षणाचा अवाढव्य खर्च यामुळे जास्त अपत्यांपासुन गरीब,सर्वसामान्य व शेतकरी दुरावल्यामुळे याचा गंभीर परिणाम पारिवारिक संबंध नामशेष होण्याच्या मार्गावर असल्याचे दिसून येते.आईवडीलांपुढे प्रश्न उपस्थित होतो की एका मुलाच्या गरजा आपण पुर्ण करू शकत नाही तर दोन किंवा तीन मुलांच्या गरजा कशा काय पुर्ण करणार!या संपूर्ण गोष्टींचा विचार करूनच आजची पिढी मुलं जन्माला घालतांना दिसतात.मोहन भागवत म्हणतात की एखाद्या समाजाचा लोकसंख्या वाढीचा दर २.१ च्या खाली जातो तेव्हा समाज नष्ट होण्याच्या मार्गावर असतो ही बाब १०० टक्के सत्य आहे यात दुमत नाही.भारताचा आदर्श लोकसंख्या वृध्दीचा दर २.१ इतका आहे.परंतु मोहन भागवत यांच्या माहीतीनुसार भारताचा लोकसंख्या दर २.१ पेक्षा कमी आहे.याकरीता प्रत्येकाला दोन पेक्षा अधिक मुले असावीत असा सल्ला मोहन भागवतांनी दिला आहे.आज जगातील चीन, इराण, युनायटेड किंग्डम, जपान, तैवान, इटली,स्पेन, सिंगापूर,रशिया या देशांमध्ये प्रजनन दरात मोठी घट झालेली आहे.त्यामुळे तेथील सरकारने प्रजनन दर वाढविण्याच्या दृष्टीकोणातुन मोठी पाऊले उचलुन येणाऱ्या अपत्याची संपूर्ण खर्चाची जबाबदारी तेथील सरकारने सुध्दा घेतली आहेत.त्या पध्दतीने भारत सरकार जर पाऊले उचलायला तयार असतील तर भारतात प्रत्येकाला दोन पेक्षा अधिक मुले जन्माला घालायला हरकत नाही.यासाठी एक मुलांच्या वरती ज्यांना मुले होतील त्यांचा जन्मापासून तर ग्रॅज्युएशन पर्यंत संपूर्ण शिक्षणाचा खर्च सरकारने करावा, त्याचबरोबर वाढती महागाई व वाढता खर्च पहाता एकच्या वरती होणाऱ्या अपत्यांचा संपूर्ण खर्चाची जबाबदारी सरकारने स्वतः घ्यावी.असे जर सरकार मार्फत होत असेल तर प्रत्येक व्यक्ती दोनपेक्षा अधिक मुले अवश्य जन्माला घालतील व यामुळे समाजांचे अस्तित्व टिकवण्यास मदत होईल, समाज आपोआप नष्ट होण्यापासून वाचेल आणि धर्म, संस्कृती व नातेसंबंध यात मोठी भर पडेल असे मला वाटते.भारतीयांनी भाषा, धर्म आणि संस्कृती जपण्यासाठी प्रत्येकांनी दोनपेक्षा अधिक मुले जन्माला घालावीत.त्याचप्रमाणे नामशेष होणाऱ्या वृक्षांना वाचवण्यासाठी जंगलतोड थांबवावी व देशात हजारो पशुपक्षी नामशेष होण्याच्या मार्गावर आहेत त्यांना सुध्दा वाचविण्याचा प्रयत्न सरकारने करावा.असे जर झाले तर संस्कृती, धर्म, भाषा व निसर्ग यांचे संतुलन टीकुन राहिल.

**रमेश कृष्णराव लांजेवार, मो.नं.९९२१६९०७७९**

# भाजपा महाराष्ट्र विधीमंडळ गटनेतेपदी देवेंद्र फडणवीस यांच्या निवडीचा जालना भाजपाकडून फटाके फोडून व पेढे वाटून जल्लोष



**जालना । प्रतिनिधी -** भारतीय जनता पार्टी महाराष्ट्र विधीमंडळ गटनेतेपदी देवेंद्रजी फडणवीस यांची निवडीचे जालना भाजपाच्या वतीने जिल्हाध्यक्ष बद्रीनाथ पठाडे व भाजपा महानगराध्यक्ष सतिष जाधव यांच्या नेतृत्वात पेढे वाटून व फटाके फोडून आनंदोत्सव साजरा करण्यात आला.

यावेळी भाजपा जिल्हाध्यक्ष बद्रीनाथ पठाडे, महानगराध्यक्ष सतिष जाधव, प्रदेश कार्यकारिणी सदस्य राम ेश्वर पाटील भांदरगे, विजय कामड,सौ. विमलताई आगलावे, बबनराव सिरसाठ, सोपान पेंढारकर, बाबासाहेब कोलते, डॉ.श्रीमंत मिसाळ, राजेश जोशी, सिध्देश्वर हसबे, रवि अग्रवाल, वसंत शिंदे, शशिकांत घुगे, महेश निकम, सुनिल पवार, सुभाष सले, अमोल कारंजेकर, श्रीकांत शेलगावकर, प्रमोद गंडाळ, मनोज बिडकर, सुमित सुरडकर, सोमेश काबलिये, आनंद झारकंडे, रामालाल जाधव, डोंगरसिंग साबळे, सकुबाई पनबिसरे, ममता कोंडयाल, अरुणाताई जाधव, वर्षा ठाकुर, वैशाली बनसोडे, मिना गायकवाड, ज्ञानेश्वर उगले, सय्यद इम्रान, जगदीश वेनगुपटला, अभिजीत अंभोरे, बद्री वाघ, अक्षय राजगिरे, समर्पंपण विजयसेनानी, पंडित शिंदे, शाम उगले, नारायण वाकचौरे, राजाराम जाधव, दत्ता जाधव, योगेश शिंमगे, संजय माधवले, अकबर परसुवाले, गुलाब पनबिसरे, श्याम जाधव, भाऊसाहेब शिमगे, उध्दव ढवळे, डॉ.सुदर्शन काळे, योगेश लहाने, उमेश पेंढारकर, शेखर बुंदिले आदींची उपस्थिती होती.

# विद्यार्थ्यांच्या अपार नोंदणीसाठी साईटची गती संथ

## जाफ्राबाद तालुक्यात ५४ टक्के विद्यार्थ्यांची नोंदणी

**दत्ता देशमुख**

**टेंभुर्णी -** नवे राष्ट्रीय शैक्षणिक धोरण-२०२० नुसार देशाच्या एकूणच शैक्षणिक पद्धतीत आमूलाग्र बदल करण्याचा प्रयत्न सुरू आहे. अभ्यासक्रमातील बदलांपासून ते कार्यपध्दतीत बदलापर्यंतचा हा मोठाच बदल आहे. यातीलच 'अपार' हा एक उपक्रम कार्यान्वित झाला आहे. तथापी, जाफ्राबाद तालुक्यात एकुण २३३ शाळेतील ३१ हजार २०२ विद्याथ्यापैकी केवळ १६ हजार ८८० विद्यार्थ्यांची अपार नोंदणी झाली असुन एकंदरीत केवळ ५४ टक्केच काम झाले आहे. तर उर्वरीत १४ हजार ३२२ विद्यार्थ्यांची अपार नोंदणी करण्याचे काम बाकी असल्याचे चित्र आहे. दिवाळी सुट्टी आणि निवडणूक कामे यात अपार आयडीचे कामे रेंगाळली होती. आधार आणि दाखल खारीज रजिस्टर वरील नावात बदल असल्याने अपार नोंदणी होत नाही. तर सद्या अपार नोंदणीसाठी जी साईट आहे. ती चालत नसल्याने नोंदणीमध्ये खोडा येत असल्याचा अपार नोदंणीद्वारे देशातील प्रत्येक विद्यार्थ्याला त्याचा स्वतंत्र ओळख क्रमांक आणि सोबतच डिजिलॉकरची सोय उपलब्ध करून दिली जात आहे. 'एक देश, एक विद्यार्थी ओळख' या संकल्पने अंतर्गत हा उपक्रम राबविण्यात येत आहे.

अपार नोंदणी बाबत तालुक्यातील शाळा तसेच प्राचार्य, मुख्याध्यापकांना सुचना देण्यात आल्या असून या उपक्रमाच्या यशस्वीतेसाठी शिक्षण विभागाकडुन पुढाकार घेतला जात असल्याचे गटशिक्षणाधिकारी डॉ. सतिश शिंदे यांनी सांगितले आहे.

निवडणूक कामामुळे अपार आयडीची कामे रेंगाळली होती. आधार आणि दाखल खारीज रजिस्टर वरील नावात बदल असल्याने अपार नोंदणी होत नाही. एखाद्या विद्यार्थ्यांची शाळा बदलायची आहे, तेव्हा त्या विद्यार्थ्याला नव्या शाळेत सर्व कागदपत्रे जमा करण्याची गरज भासणार नाही. त्याशाळेला ती माहिती विद्यार्थ्यांचा बारा अंकी अपार नंबर टाकताच सर्व माहिती मिळेल. ज्याने कागदपत्रे जमा करण्याची गरज भासणार नाही. प्रत्येक विद्यार्थ्यांसाठी डीजीलॉकर उपलब्ध राहणार असल्याने नोकरींच्या वेळी शाळा संबंधी कागदपत्रे आल्यावर त्याला पडताळणी करण्याची गरज भासणार नाही. ही सर्व कागदपत्रे ही डिजिटल स्वरूपात उपलब्ध राहणार आहे. जाफ्राबाद तालुक्यात सर्व शासकीय खाजगी अशा नोंदणीकृत २३३ शाळा असून त्यात शिक्षण घेणारे ३१ हजार २०२ हजार विद्यार्थी आहेत. ज्याची 'एक देश, एक विद्यार्थी ओळख' साठी अपार आयडी बनविण्याचे काम सुरु आहे. सध्या १६ हजार ८८० विद्यार्थ्यांची जवळपास नोंदणी झालेली आहे. उर्वरीत १४ हजार ३२२ विद्यार्थ्यांची अपार नोंदणी अद्यापही बाकी आहे.






हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक दीपक श्रीकृष्ण शेळके यांनी जगदंबा प्रिंटर्स, डबल जीन, जुना जालना ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक **युवा आदर्श**, शीतल किराणा जवळ, गांधीनगर, रोहणवाडी रोड, जालना. ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. **संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके मो.नं. ८३९००९८८८६, ८३९००४८८८६,** E-mail : yuva.aadarsh@gmail.com. RNI No. MAHMAR/2019/78282
Printer, Publisher and Owner Deepak Shrikrushna Shelke Printed At Jagdamba Printers, Plot no. 12 Dabal Jin, JALNA. Tq. Dist. JALNA 431203 (Maharashtra) Place of Publication Office Daily Yuva Aadarsh, Near Shital Kirana, Gandhinagar, Rohanwadi Road, JALNA, Dist JALNA 431203 (Maharashtra) Editor : Deepak Shrikrushna Shelke Mob no. 8390098886, 8390048886
E-mail : yuva.aadarsh@gmail.com RNI No. MAHMAR/2019/78282. अंकात प्रकाशित होणाऱ्या लेखाशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही. लेखातील मजकुरासंदर्भातील सर्वस्वी जबाबदारी ही संबंधीत लेखकाचीच असेल.